**रे. दि. मु. क्र. १००/२०१०**

सौ. पुजा विजय काळे व इतर ..... **वादी**

**वि.**

श्री. पांडूरंग नाना भोपते व इतर .... **प्रतिवादी**

**नि. ११२ वरील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज वादींनी मयत प्रतिवादी क्र. १ च्या वारसांच्या दुरुस्तीकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. १/अ व १/ब यांनी नि. १२१ वर म्हणणे दिले. वादीचा अर्ज मुदतीत नसल्याचे व वादींचा दावा अबेट झाल्याने तो रद्द होण्यास पात्र असल्याचे कथन त्यांनी केले आहे. या अर्जास प्रतिवादी क्र. १/क ते १/ई यांनी म्हणणे दिले नाही.

३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. वादींचे वकिलांचे निवेदन असे की, प्रतिवादी क्र. १ पांडूरंग नाना भोपते हे दि. १९/०४/२०१५ रोजी मयत झाले असून त्यांच्या नावापुढे " मयत" असे लिहून त्यांचे वारसांची नावे नोंद होणेकामी दावा दुरुस्त करणे गरजेचे आहे. प्रस्तुत दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची आहे. प्रस्तुत दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात यावा. प्रतिवादी क्र. १/अ व १/ब यांचे वकिलांचे निवेदन असे की, वादींनी प्रतिवादी क्र. १ पांडूरंग भोपते हे मयत झाल्याचा दि. १९/०४/२०१५ लिहिलेला आहे. परंतू पांडूरंग भोपते हे दि. २०/०१/२०१५ रोजी मयत झालेले आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मुदतीत नाही. त्यामुळे तो रद्द करण्यात यावा.

४. वादींनी मागणी केलेली दुरुस्ती ही किरकोळ व तांत्रिक स्वरुपाची आहे. वादींच्या या दुरुस्तीमुळे दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. तसेच वादी

व प्रतिवादी यांच्यातील वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

# आदेश

१. वादींनी प्रतिवादी क्र. १ चे वारसांची दुरुस्ती पुढील तारीख किंवा त्यापुर्वी करुन घ्यावी व दाव्याची दुरुस्त प्रत दाखल करावी.

(न्यायासनावर अधिघोषीत केले)

सही/-XX

कराड. **(प्र. अ. सवदीकर)**

दि. २६/०९/२०१७ दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड